**<u>नि.फौ.ख.क्र.८२४/२०१३.</u>**

**<u>निशाणी क्रमांक १०९४/क.</u>**

**<u>साक्षीदार क्रमांक ०२</u>**

**सत्यप्रतिज्ञेवर कथन करतो की,**

**माझे नाव –** अशोक अंतु जैन,

**वय वर्ष –** ७०, **व्यवसाय –** रिटायर्ड,

**राहणार –** जससिंगपूर.

**<u>अभियोगपक्षातर्फे सरतपास शपथेवर सहा.सर.वकील श्री.एस.जे.सरनोबत यांचे मार्फत सुरु...</u>**

**०१.** ऑगस्ट, २०१२ मध्ये मी लक्ष्मीपुरी पोलीस ठाणे येथे पोलीस उपनिरिक्षक म्हणुन कार्यरत होतो. गु.र.क्र.१०७/२०१२ चा तपास माझ्याकडे तोंडी आदेशाने आला. मी सदर कामी स्वत: फिर्याद (नि.क्र.१०७०) दाखल केली आहे. त्यावर माझा दाखल करणार म्हणुन सही व शेरा आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर असुन सदरचा मजकुर फिर्यादीच्या सांगण्याप्रमाणे नोंदवलेला आहे. आता मला दि.२२/०८/२०१२ रोजीचा जप्ती पंचनामा दाखविण्यात आला. संदिप बुरुड व शुभांगी पाटील यांचा श्रवण तपासणी अहवाल जप्त केला. पंचनाम्यावर माझी तसेच दोन पंचाची सही असुन त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र.१०९५** देण्यात येत आहे. दि.२३/०८/२०१२ रोजी आरोपी क्र.०१ ते ०७ यांना अटक केली. दि.२४/०८/२०१२ रोजी आरोपी क्र.०१ राहुल परब यांचा निवेदन पंचनामा नोंदवला. आता मला निवेदन पंचनामा दाखविण्यात आला. त्यावर माझी, आरोपीची व साक्षीदारांची सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र. १०९६** देण्यात येत आहे. आरोपीच्या निवेदनावरुन सी.पी.आर.हॉस्पीटल येथील अन्य आरोपींचे कागदपत्र जप्त केले व पंचनामा केला. आता मला पंचनामा दाखविण्यात आला. त्यावर माझी, आरोपीची व साक्षीदारांची सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र.१०९७** देण्यात येत आहे. राहुल परब व अभिजीत पाटील यांच्या हाताचे नमुने घेतले व त्याबाबतचा पंचनामा केला. आता मला पंचनामा दाखविण्यात आला. त्यावर माझी व पंचाची सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र.१०९८** देण्यात येत आहे. आरोपी सुहास

कांबळे यांच्या हाताच्या अंगठयाच्या ठश्यांचे नमुने घेतले व त्याबाबतचा पंचनामा केला. आता मला पंचनामा दाखविण्यात आला. त्यावर माझी व पंचाची सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र.१०९९** देण्यात येत आहे. दि.२५/०८/२०१२ रोजी साक्षीदार पुष्पांजली गुरवळ -सोळंखी यांनी हजर केलेली कागदपत्र जप्त केली व त्याबाबतचा पंचनामा केला. आता मला पंचनामा दाखविण्यात आला. त्यावर माझी व पंचाची सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र.११००** देण्यात येत आहे. दि.३०/०८/२०१२ रोजी राहुल परब व अभिजीत पाटील यांच्या घराची झडती घेतली व त्याबाबतचा पंचनामा केला. आता मला जप्ती पंचनामा दाखविण्यात आला. त्यावर माझी व पंचाची सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र.११०१** देण्यात येते. दि.३०/०८/२०१२ रोजी साक्षीदार रविंद्र जाधव यांच्याकडुन हार्ड डिस्क जप्त केली त्याबाबतचा जप्ती पंचनामा केला. आता मला जप्ती पंचनामा दाखविण्यात आला. त्यावर माझी व पंचाची सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र.११०२** देण्यात येत आहे. दि.३१/०८/२०१२ रोजी साक्षीदार सतिश दत्तात्रय जोशी यांनी कागदपत्र हजर केली ती जप्त करुन त्याबाबतचा पंचनामा केला. आता मला जप्ती पंचनामा दाखविण्यात आला. त्यावर माझी व पंचाची सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र.११०३** देण्यात येत आहे. दि.०३/०९/२०१२ राहुल परब व अभिजीत पाटील यांच्या हस्ताक्षराचे नमुने घेतले व त्याबाबतचा पंचनामा केला. आता मला पंचनामा दाखविण्यात आला. त्यावर माझी व पंचाची सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र.११०४** देण्यात येत आहे. दि.०३/०९/२०१२ रोजी साक्षीदार अभिजित मुळीक यांनी कागदपत्र हजर केली ती जप्त करुन त्याबाबतचा पंचनामा केला. आता मला जप्ती पंचनामा दाखविण्यात आला. त्यावर माझी व पंचाची सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **नि. क्र.११०५** देण्यात येत आहे. दि.०३/०९/२०१२ रोजी आरोपी क्र.०१ व ०२ यांच्या हस्ताक्षरातील असलेले कागदपत्र वेगवेगळे केले. त्याबाबतचा पंचनामा केला. आता मला पंचनामा दाखविण्यात आला. त्यावर माझी व पंचाची सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र.११०६** देण्यात येते. दि.०८/०९/२०१२ रोजी डॉ.संदिप बागडी यांच्याकडुन मुळ हस्ताक्षराची नमुने प्राप्त करुन घेतले व

त्याबाबतचा पंचनामा केला. आता मला  पंचनामा दाखविण्यात आला. त्यावर माझी व पंचाची सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र.११०७** देण्यात येत आहे. दि.१२/०९/२०१२ रोजी फिर्यादीने हजर केलेली बिल बुक जप्त केली व त्याबाबतचा पंचनामा केला. आता मला जप्ती पंचनामा दाखविण्यात आला. त्यावर माझी व पंचाची सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र.११०८** देण्यात येत आहे. दि.१९/०९/२०१२ रोजी साक्षीदार आंगडी यांनी ५२ लोकांचे केसपेपर व कागदपत्र हजर केली ती जप्त करुन त्याबाबतचा पंचनामा केला. आता मला जप्ती पंचनामा दाखविण्यात आला. त्यावर माझी व पंचाची सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र.११०९** देण्यात येत आहे. दि.२३/०९/२०१२ रोजी अपंगत्व कागदपत्र आरोपी व अन्य इसमांनी ३४ कागदपत्र हजर केली ती जप्त करुन त्याबाबतचा पंचनामा केला. आता मला जप्ती पंचनामा दाखविण्यात आला. त्यावर माझी व पंचाची सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र.१११०** देण्यात येत आहे. दि.०७/०५/२०१३ रोजी लाभार्थी व अन्य अनु.क्र.०१ ते ७५ इसमांनी कागदपत्र हजर केली ती जप्त करुन त्याबाबतचा पंचनामा केला. आता मला जप्ती पंचनामा दाखविण्यात आला. त्यावर माझी व पंचाची सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र.११११** देण्यात येत आहे. दि.१४/०५/२०१३ रोजी लाभार्थी व अन्य अनु.क्र.०१ ते ०७ इसमांनी कागदपत्र हजर केली ती जप्त करुन त्याबाबतचा पंचनामा केला. आता मला जप्ती पंचनामा दाखविण्यात आला. त्यावर माझी व पंचाची सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र.१११२** देण्यात येत आहे. दि.२४/०९/२०१२ रोजी पुष्पाजंली गुरवळ यांनी त्यांच्या हस्ताक्षरांचे व सहयांचे नमुने घेतले व त्याबाबतचा पंचनामा केला. आता मला पंचनामा दाखविण्यात आला. त्यावर माझी व पंचाची सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र.१११३** देण्यात येत आहे. दि.२५/०९/२०१२ रोजी संदेश बागडी व अभिजित मुळीक यांच्या हस्ताक्षरांचे नमुने घेतले त्याबाबतचा पंचनामा केला. आता मला पंचनामा दाखविण्यात आला. त्यावर माझी व पंचाची सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र.१११४** देण्यात येत आहे. दि.२५/०८/२०१२ रोजी पुष्पांजली गुरवळ यांचा जबाब नोंदविला.

दि.३१/०८/२०१२ व १३/०५/२०१३ रोजी पुष्पांजली गुरवळ यांचा पुरवणी जबाब नोंदवण्यात आला. दि.३०/०८/२०१२ रोजी रविंद्र जाधव, नंदकुमार जामदाडे व प्रफुल्ल जगताप यांचे जबाब नोंदविले. दि.३१/०८/२०१२ रोजी सतिश जोशी यांचा जबाब नोंदविला. दि.११/०९/२०१२ रोजी रघुजी थोरात यांचा जबाब नोंदवला. दि.३१/०५/२०१३ रोजी रघुजी थोरात यांचा पुरवणी जबाब नोंदविला. दि.०२/०९/२०१२ रोजी शिल्पा हुजुर-बाजार यांचा जबाब नोंदविला. दि.१३/०५/२०१३ रोजी शिल्पा हुजुरबाजार यांचा पुरवणी जबाब नोंदविला. दि.०३/०९/२०१२ रोजी अभिजित अशोक मुळीक यांचा जबाब नोंदविला. दि.१३/०५/२०१३ रोजी अशोक मुळी यांचा पुरवणी जबाब नोंदविला. दि.३०/०५/२०१३ रोजी बाळासाहेब रामचंद्र वाकडे यांचा जबाब नोंदविला. दि.०५/१०/२०१२ रोजी पो.कॉ.बबन कुंभार यांचा जबाब नोंदविला व दि.१७/०५/२०१३ रोजी अन्य पोलीसांचे तपास टिप्पण नोंदविले. दि.११/०८/२०१३ रोजी वेगवेगळया लोकांचे वेगवेगळया हस्ताक्षरातील वेगवेगळे सहयांचे नमुने मा.पोलीस अधिक्षक कार्यालय, कोल्हापूर यांच्याकडे पाठविले. आता मला ते पत्र दाखविण्यात आले. ते तेच आहे. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र.१११५** देण्यात येत आहे. मा.पोलीस अधिक्षक यांनी पाठविलेले कागदपत्र पुढील तपासणीकरीता हस्ताक्षर तज्ञ, पुणे येथे पाठविले. आता मला ते पत्र दाखविण्यात आले. ते तेच आहे. त्यावर तात्कालीन पोलीस अधिक्षक विजयसिंह जाधव यांची सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र.१११६** देण्यात येत आहे. दि.०५/१०/२०१२ रोजी वेगवेगळया आरोपींचे अंगुली मुद्रांचे नमुने पुढील तपासणीकरीता संचालक अंगुली मुद्रा केंद्र, पुणे येथे पाठविले. आता मला ते पत्र दाखविण्यात आले. ते तेच आहे. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र.१११७** देण्यात येत आहे. दि.१९/१२/२०१२ रोजी गुन्हयातील हार्ड डिस्क वैज्ञानिक प्रयोग शाळा, मुंबई येथे पुढील तपासणीकरीता पाठविले. आता मला ते पत्र दाखविण्यात आले. ते तेच आहे. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र.१११८** देण्यात येत आहे. दि.०९/०९/२०१२ रोजी अधिष्ठाता शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, कोल्हापूर यांना आरोपी क्र.०१ व ०२ यांची माहिती मिळण्याकरीता

पत्र पाठविले. आता मला ते पत्र दाखविण्यात आले. ते तेच आहे. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **नि. क्र.१११९** देण्यात येत आहे. दि.२६/०९/२०१२ रोजी सी.पी.आर.हॉस्पीटल यांच्याकडुन गुन्हयाच्या अनुषंगाने माहिती प्राप्त झाली. त्यास **नि.क्र.११२०** देण्यात येत आहे. दि.०१/०६/२०१३ रोजी डॉ.संदेश बागडे यांच्या नेमणुकीचा आदेश प्राप्त झाला. आता मला तो आदेश दाखविण्यात आले. तो तोच आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र.११२१** देण्यात येत आहे. दि.१८/०९/२०१२ रोजी सी.पी.आर.कडुन १८३/२०१२ चे छाननी अहवाल प्राप्त झाला. तो तोच आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र.११२२** देण्यात येत आहे. दि.१२/०९/२०१२ रोजी २९ आरोपींचा तपासणी अहवाल प्राप्त झाला. आता मला तो अहवाल दाखविण्यात आला. त्यास **नि.क्र.११२३** देण्यात येत आहे. या कामातील आरोपींची अपंगत्वाबाबतची तपासणी करुन त्यांचे अहवाल प्राप्त झाले. काही आरोपींची तपासणी मुंबई येथे करण्यात आली. त्यापैकी एक आरोपी अपंगत्वाचा दाखला मिळण्यास पात्र बाकीचे आरोपी अपात्र असा अहवाल प्राप्त झाला. ते या कामी हजर केले. तपासाअंती आरोपी यांनी बनावट प्रमाणपत्र प्राप्त करुन सरकारी नोकरी, समाज कल्याण कार्यालयामार्फत लाभ, एस.टी.चे फ्री पास तसेच त्यातील एक आरोपी रविंद्र बाबुराव जंगम सहा.आयुक्त पंशुसंवर्धन यासारखी पद प्राप्त करुन फसवणुक केली असे निष्पन्न झाल्याने मी दोषारोपत्र न्यायालयात दाखल केले. जप्त मुद्देमाल पाहिल्यास मी ओळखू शकतो. आरोपींना पाहिल्यास मी ओळखू शकतो. जे आरोपी शासकीय कर्मचारी होते त्यांच्याविरुध्द दोषारोप दाखल करण्यात आले आहे. त्यांच्या विभागाची परवानगी घेतली. १३६ पैकी १२४ आरोपींची अपंगत्वाची तपासणी झाली. त्यानंतर माझी बदली झाली.

**आरोपी क्र.०१, ०२, २१ व ५७ तर्फे विधिज्ञ श्री.एस.एस.चौगले यांच्यामार्फत उलटतपास सुरु...**

**०२.** हे म्हणणे खरे नाही की, आरोपीविरुध्द खोटे दोषारोपपत्र दाखल केले.

**उलटपास पुर्ण...**
**फेरतपास नाही...**

**<u>आरोपी क्र.०६, ०७, ०९, १०, २१, २३, २४, २७, ३०, ३१ ते ३३, ३७, ४१ ते ४५, ४८, ५२, ५३, ६६, ६७, ७१, ७४, ७३, ८३ ते ८५, ८७, ९०, ९२, ९९, १०५, १०८, १३० व १३१ तर्फे विधिज्ञ श्री.बी.एम.शास्त्री यांच्यामार्फत उलटतपास सुरु..</u>**

**०३.** हे म्हणणे खरे नाही की, मी दिलेला जबाब माझ्या टिप्पणीनुसार दिलेला आहे. मी कागदपत्र पाहुन जबाब दिलेला आहे. मी सब इन्स्पेक्टर म्हणुन सन २०१५ साली सेवानिवृत्त झालो. हे म्हणणे खरे आहे की, प्रत्येक पोलीस ठाण्यात एक पी.आय. व चार ते पाच सब इन्स्पेक्टर असतात. हे म्हणणे खरे आहे की, पोलीस ठाण्यामध्ये येणारी माहिती लिहुन घेण्यासाठी ठाणे अंमलदार असतो. हे म्हणणे खरे आहे की, ठाणे अंमलदार यांच्याकडे तक्रार आली होती. हे म्हणणे खरे आहे की, दखलपात्र गुन्हयाची माहिती आली तर ठाणे अंमलदार गुन्हा दाखल करतो. हे म्हणणे खरे आहे की, गुन्हा दाखल केल्यानंतर त्याची माहिती ठाणे अंमलदार पी.आय. यांना देतो. हे म्हणणे खरे आहे की, गुन्हयाचे स्वरुप व गंभीरता पाहुन त्याचा तपास कोणाकडे द्यायचा हे पी.आय. मौखिक अथवा लेखी आदेशाने ठरवतात. हे म्हणणे खरे आहे की, प्रस्तुतचा गुन्हा दाखल झाला त्या दिवशी मी ठाणे अंमलदार म्हणुन होतो. हे म्हणणे खरे आहे की, मी ठाणे अंमलदार म्हणुन फिर्यादीची फिर्याद नोंदविली. हे म्हणणे खरे आहे की, मी प्रस्तुत फिर्यादीची माहिती पी.आय.यांना दिली. हे म्हणणे खरे नाही की, ठाणे अंमलदार यांनी गुन्हयाचा तपास करायचा नाही असा प्रघात आहे.

**०४.** हे म्हणणे खरे आहे की, फिर्याद नोंदवताना डॉ.चेतन घोरपडे आले होते त्यांच्याशी माझा विचारविनिमय झाला. हे म्हणणे खरे आहे की, फिर्यादी यांनी सोबत आणलेले कागदपत्र मी पाहिले होते. हे म्हणणे खरे आहे की, प्रत्येक आरोपीचे प्रकरण वेगवेगळे होते. हे म्हणणे खरे आहे की, आरोपीने दाखल केलेले कागदपत्र न्यायालयात हजर आहे. हे म्हणणे खरे आहे की, लाभार्थी जेव्हा सी.पी.आर.येथे जातो तेव्हा त्याला केसपेपर काढावा लागतो. हे म्हणणे खरे आहे की, केस पेपर काढल्यानंतर त्याची तपासणी केली जाते.

**प्रश्नः-** श्रवण आलेख अहवाल काढण्याची सी.पी.आर.येथे सुविधा नव्हती ?

**उत्तरः-** काही कालावधी होती व काही कालावधी नव्हती.

हे म्हणणे खरे आहे की, ज्या कालावधीमध्ये श्रवण आलेख अहवाल काढण्याची सी.पी. आर.येथे सुविधा नव्हती त्या कालावधीमध्ये बाहेरुन विविध हॉस्पीटलमधुन सदरचा अहवाल काढुन आणावा लागत असे. हे म्हणणे खरे आहे की, सी.पी.आर.हॉस्पीटलमध्ये सेवा बजावुन बाहेर पडलेल्या डॉक्टरांकडुन सदरचा अहवाल आणत असे. हे म्हणणे खरे आहे की, श्रवण आलेख अहवालाची तपासणी करुन त्यानंतर त्याबाबचे प्रमाणपत्र देण्यात आले. दि.१८/११/१० रोजी बहिरेपणाच्या अपंगत्वाचा दाखला कसा द्यावा याबाबत सरकारकडून नियमावली जाहीर झाली होती व ती मी पाहिली आहे. हे म्हणणे खरे आहे की, नियमावलीनुसार तीन तज्ञांची कमिटी हॉस्पीटलने नेमायची आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझ्याकडे आलेल्या प्रमाणपत्रामध्ये तीन डॉक्टरांच्या सहया आहेत. हे म्हणणे खरे आहे की, त्या तीनमधील एक सही फिर्यादी डॉ.चेतन घोरपडे यांची आहे. हे म्हणणे खरे नाही की, प्रमाणपत्र देण्यामागे तीन डॉक्टर आहेत. हे म्हणणे खरे नाही की, सदरचे प्रमाणपत्र कसे तयार झाले याबद्दल मी कोणताही साक्षीदार तपासलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, जे कागदपत्र हॉस्पीटलमधुन मिळाले त्याबद्दल मी खरे-खोटे याचा तपास केलेला आहे ते कसे तयार केले याबद्दल मी तपास केलेला नाही.

**०५.** सदरचे प्रकरण हे दि.०१/०६/२०११ ते ०८/०८/२०१२ या कालावधीमध्ये दिलेले प्रमाणपत्राबद्दल आहे. हे म्हणणे खरे आहे की, सदर गुन्हातील कागदपत्र मला सी.पी. आर.मधुन मिळाले आहेत. हे म्हणणे खरे नाही की, अनेक रुग्णांच्या शस्त्रक्रिया झालेल्या होत्या. हे म्हणणे खरे आहे की, पंचनामा केल्याप्रमाणे मी सर्व कागदपत्र जप्त केलेले आहेत. हे म्हणणे खरे नाही की, लाभार्थ्यांना मिळालेले प्रमाणपत्र देखील मी जप्त केलेले आहेत. जप्त केलेल्या कागदपत्रांच्या पडताळणीसाठी बेरा तपासणी करण्यात आली. प्रस्तुत तपासणीसाठी माणुस पाठविला, कागदपत्रे पाठविली नाहीत. मुंबई येथे आलीवर जंग या संस्थेमध्ये तपासणी -करीता आरोपींना पाठविले होते त्यानुसार अहवाल प्राप्त झाले. हे म्हणणे खरे आहे की, व्यक्तीला तपासणीकरीता पाठविलेले असताना त्यासोबत कागदपत्र पाठविली नव्हती. त्यावेळी पोलीस कॉन्स्टेबल तपासणीसाठी सोबत जात होता. पात्र व अपात्र अहवाल

पाठविला. तो पुरावा या कामी हजर केला आहे. सदरचा व्यक्ती हा पात्र आहे किंवा नाही याबाबतचा खुलासा अथवा त्यांचे जबाब नोंदविले नाहीत.

**०६.** हे म्हणणे खरे नाही की, अंतिम दोषारोपपत्रामध्ये अनेक त्रुटी आहेत. हे म्हणणे खरे आहे की, मी सर्व लाभार्थ्यांना बोलावून त्यांच्याकडून प्रमाणपत्र जप्त केलेले आहेत. हे म्हणणे खरे नाही की, त्याबाबत मी लाभार्थ्यांचे जबाब नोंदविले नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, ज्या विभागाची मंजुरी घेतली त्यांना दोषारोपपत्र पाठविले नाही. हे म्हणणे खरे नाही की, तपासणीकरीता पाठविलेल्या लाभार्थ्यांचे हस्ताक्षराचे नमुने घेतलेले नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, लाभार्थ्यांकडून जप्त केलेले प्रमाणपत्र त्यांनी स्वत: तयार केलेले नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींनी कोणताही गुन्हा केलेला नसताना त्यांच्याविरुध्द खोटे दोषारोपपत्र दाखल करुन त्यांना चौदा वर्ष वेठीस धरलेले आहे. हे म्हणणे खरे नाही की, सी.पी.आर.मधील डॉक्टरांना वाचवण्यासाठी त्यांच्याशी संगणमत करुन खोटे दोषारोपपत्र दाखल केले आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आज रोजी न्यायालयासमोर खोटी साक्ष देत आहे.

**उलटपास पुर्ण...**

**फेरतपास नाही...**

**सदरचा उलटतपास आरोपी क्र.६२ तर्फे विधिज्ञ श्री.यु.डी.वाडकर, आरोपी क्र.९३, १२७ तर्फे विधिज्ञ श्री.डी.आर.कवाळे, आरोपी क्र.३४, ३९, ५५, ६८, १०७, १०९, १११, ११३, ११६, ११७ तर्फे विधिज्ञ श्री.डी.जी.पाटील, आरोपी क्र.२८, ५४, ११७ तर्फे विधिज्ञ श्री.जे.व्ही.खाडे, आरोपी क्र.१२६ तर्फे विधिज्ञ श्री.के.व्ही.पठाडे, आरोपी क्र.४६ व ४७ तर्फे विधिज्ञ श्री.व्ही.एस.बन्ने, आरोपी क्र.११ तर्फे विधिज्ञ श्री.एम.के.पाटील, आरोपी क्र.१७ तर्फे विधिज्ञ श्री.आर.जे. हिलाल, आरोपी क्र.७०, ९१, १५, ८०, १९, २५, २६ व ६८ तर्फे विधिज्ञ श्री.एस.आर.शिंदे, आरोपी क्र.३ ते ५ तर्फे विधिज्ञ श्री.ए.जे.देशपांडे, आरोपी क्र.१३, २९, ३६, ४०, ६४, ६५, ९७ तर्फे विधिज्ञ श्री.व्ही.ए.सावंत, आरोपी क्र.१०४ तर्फे विधिज्ञ श्री.एस.आर.तांबे, आरोपी क्र.१२३ तर्फे विधिज्ञ श्री.पी.पी.साठे-पाटील, आरोपी क्र.१२२ तर्फे विधिज्ञ श्री.व्ही.डी.म्हांगोरे, आरोपी क्र.१२१ तर्फे विधिज्ञ श्री. एम.के.पाटील, आरोपी क्र.११४ तर्फे विधिज्ञ**

**श्री.व्ही.एस.निकम, आरोपी क्र.१३२ तर्फे विधिज्ञ श्री.ए.व्ही.हिलगे, आरोपी क्र.५१ तर्फे विधिज्ञ श्री.एस.एस.चौगले, आरोपी क्र.५५ तर्फे विधिज्ञ श्री.पी.के.नावले, आरोपी क्र.१८, २०, ९८ तर्फे विधिज्ञ श्री.आर.जी. शेळके, आरोपी क्र.७७, ७८, १०१ तर्फे विधिज्ञ श्रीमती पी.व्ही. कांबळे, आरोपी क्र.६६ तर्फे विधिज्ञ श्रीमती एच.आर.खंडेलवाल, आरोपी क्र.५८ ते ६० व १३४ तर्फे विधिज्ञ श्री.व्ही.ए.पाटील, आरोपी क्र.३८ व ९५ तर्फे विधिज्ञ श्री.सी.व्ही.पाटील यांनी स्वीकारला....**

**''श्रवणोत्तर निवेदन स्वीकृत''**

Digitally signed by SHILPA VISHVESH KULKARNI
Date: 2026.05.15 17:31:12 +0530

( शिल्पा वि. कुलकर्णी )
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
दि.१४/०५/२०२६. न्यायालय क्र.१४, कोल्हापूर.